CNR- MHSO07-000607-2024

दाखल दिनांक – १५.१०.२०२४

नोंदणी दिनांक – १९.१०.२०२४

निकाल दिनांक – २२.०४.२०२६

कालावधी – ०१ व., ०६ म., ०७ दि.

**<u>४ थे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), पंढरपूर यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी ए. एस. सोनवलकर)

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५०२/२०२४</u>**

**नि.क्र. १५**

स्टेट बँक ऑफ इंडिया, तर्फे
राहुल मच्छींद्र गाडेकर,
वयः ३८ वर्षे, धंदाः ब्रँच मॅनेजर,
रा. पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर ... **<u>वादी</u>**

**<u>विरुध्द</u>**

भारत हणमंत जाधव
वयः ६१ वर्षे, धंदाः शेती,
रा. सिध्देवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर . ... **<u>प्रतिवादी</u>**

---

| | | |
|---|---|---|
| वादी तर्फे विद्वान विधीज्ञ | – | श्री. व्ही. एन. देशपांडे. |
| प्रतिवादी | – | एकतर्फा |

---

**नि का ल प त्र**

(जाहीर केल्याचा दिनांक : २२/०४/२०२६)

१) प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींकडून वादीस रक्कम रुपये १,३५,४९८/- व्याजासह वसुल होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) **वादीचे थोडक्यात वादकथन खालील प्रमाणेः-**

वादी बँक ही स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा १९५५ प्रमाणे स्थापन झालेली बँक असून त्याचे मुख्य्य कार्यालय मादाम कामा रोड, नरिमन पॉईंट, मुंबई येथे आहे व ती बँकींगचा व्यवसाय करते. सदर बँकेची शाखा पंढरपूर येथे आहे. सदर शाखा मॅनेजर यास दावा चालविणेचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

३) प्रतिवादी यांच्या विनंतीवरून सदर वादी बँकेने प्रतिवादी यांना दिनांक ०९.०७.२०२१ रोजी जनावरांच्या खाद्यासाठी, गवत, मका इ. पिके घेण्यासाठी आणि दुग्ध व्यवसाय चालवण्यासाठी, दुग्ध व्यवसायातील गुरे, ऊस, मका इ. उभ्या पिकांच्या तारणावर आणि जमिनीच्या गहाणखतावर पत्र जारी करून १,००,०००/- रूपयांचे कर्ज मंजुर केले होते.

४) सदर कर्जाची देय परतफेड सुनिश्चित करण्यासाठी आणि सुरक्षा म्हणून प्रतिवादींनी वादी बँकेच्या नांवे दिनांक ०९.०७.२०२१ रोजी करारपत्र, रककम रूपये १,००,०००/- रूपयांचे गहाणखत, संमती कलमचा परिशिष्ट १, प्रतिवादीचे हमीपत्र, विमा माफीचा करार इत्यादी कागदपत्रे करून दिली. प्रतिवादी कर्जखाते क्र. ४०२८३०७२९२७ असा आहे. कर्जाच्या कागदपत्रांमध्ये असे नमूद केले आहे की, कर्जावर सुरूवातीला सहामाही विश्रांतीसह वार्षिक १२% दराने व्याज आकारले जाईल. तसेच आर.बी.आय. च्या निर्देशानुसार व्याजदर वेळोवेळी बदलतो व सध्या व्याज दर १३% आहे. प्रतिवादी यांनी हे देखील मान्य केले आहे की, ते विमा प्रीमियम, तपासणी शुल्क, हमी शुल्क, खर्च व इतर खर्च इत्यादी सहन करतील. तसेच प्रतिवादीने मान्य केले आहे की, मागणीनुसार कर्ज व्याजासह परत करेल, वादी बँकेने प्रतिवादीला कर्जाची परतफेड करण्याची विनंती केली, परंतु प्रतिवादी अपयशी ठरले आहेत. त्यामुळे वादीने प्रतिवादींना दिनांक ०६.०५.२०२४ रोजी वकीलांमार्फत कायदेशीर नोटीस

पाठवली व थकित कर्जाच्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर प्रतिवादींना नोटीस मिळूनही त्यांनी रक्कम परतफेड केली नाही. त्यामुळे वादीला प्रस्तुतचा दावा कर्जवसुल करणेकामी दाखल करणे भाग पडल्याचे वादीने कथन केले आहे. वादीस प्रतिवादींकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील खालीप्रमाणे –

| **रक्कम** | – | **तपशील** |
|---|---|---|
| ९८,८५१/– | – | दिनांक २८.०९.२०२२ रोजीपर्यंत व्याजासह कर्जाची थकबाकी रक्कम |
| २९,४५०/– | – | दिनांक २९.०९.२०२२ पासून खटला करेपर्यंत व्याजाची रक्कम. |
| ४,१९७/– | | थकबाकी रकमेवर विलंब झाल्यामुळे जमा झालेले दंड व्याज |
| १,५००/– | – | नोटीस फी |
| १,५००/– | – | इतर फी. |
| १,३५,४९८/– | – | प्रतिवादींकडून एकूण देय रक्कम. |

५) त्यामुळे प्रतिवादी यांनी रक्कम रुपये १,३५,४९८/– वर द.सा.द.शे. १३.००% प्रमाणे दावा दाखल केलेपासून ते रक्कम वसुल होईपावेतो व्याजासह मिळण्याची विनंती केली.

६) प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स रुजू होऊनही ते हजर न झाल्याने दावा त्यांच्या विरुध्द एकतर्फा दिनांक २५.०६.२०२५ च्या आदेशाने चालविण्यात आला.

७) दावा व दाव्यासोबत दाखल केलेले संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. मी दाव्याचे अंतिम निर्णयाकरीता खालीलप्रमाणे वादप्रश्न निश्चित केले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने शाबीत केले का की, प्रतिवादी यांनी वादीकडून तारीख ०९.०७.२०२१ रोजी रक्कम रूपये १,००,०००/- कर्जस्वरूपी १२ टक्के व्याजदराने स्वीकारली ? | होकारार्थी. |
| २. | वादी हा रक्कम रूपये १,३५,४९८/- प्रतिवादीं कडून वसुल होवून मिळणेस पात्र आहे का ? | फक्त रक्कम रूपये १,३५,४९८/-. |
| ३. | वादी हा प्रतिवादी कडून रक्कम रूपये १,३५,४९८/- वर वसुल होवून मिळेपर्यंत व्याज मिळणेस पात्र आहे का ? | वादी प्रतिवादी कडून एकूण रक्कम रूपये १,३५,४९८/- वर दावा दाखल तारखेपासून मुद्दल रक्कम वसुल होवून मिळेपर्यंत द.सा.द.शे १२.०० टक्के दराने व्याज मिळणेस पात्र आहे. |
| ४. | वादी हा प्रतिवादींच्या मिळकतीवर बोजा ठेवण्यास तसेच हस्तांतरास मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे का ? | नकारार्थी |
| ५. | अंतिम आदेश व हुकूमनामा ? | दावा अंशतः मंजुर करणेत येतो. |

## <u>का र ण मी मां सा</u>

८) वादीने आपल्या कथनांचे पुष्ट्यर्थ नि.क्र. ०७ लगत राहुल मच्छींद्र गाडेकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून, त्यामध्ये दाव्यातील संपूर्ण

कथनांचा पुर्नच्चार केला आहे. प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला असल्याने वादीचा उलटतपास घेतला गेलेला नाही. त्यामुळे वादीचा पुरावाही आव्हानित झालेला नाही. वादीने नि.क्र. १४ लगत पुरसिस दाखल करुन आपला तोंडी पुरावा बंद केला आहे.

९) व्यवस्था पत्र (नि.क्र. ०८), हायपोथेकेशन करारपत्र (नि.क्र.९),विमा नुकसान भरपाई पत्र (नि.क्र.१०), पुनरूज्जीवन पत्र(नि.क्र.११), खाते उतारा (नि.क्र.१२), नोटीस प्रत (नि.क्र. १३) ही कागदपत्रे दाखल करुन सदर कागदोपत्री पुराव्याचा आधार वादीने घेतला आहे.

१०) वादीतर्फे विद्वान वकिल श्री. व्ही. एन. देशपांडे यांचा युक्तिवाद ऐकला.

११) वादीतर्फे विद्वान वकिलांनी आपल्या युक्तिवादात प्रतिवादी यांना वादी बँकेने दिनांक ०९.०७.२०२१ रोजी गहाणखतावर पत्र जारी करून १,००,०००/- रूपयांचे गवत, मका इ. पिके घेण्यासाठी आणि दुग्ध व्यवसाय चालवण्यासाठी कर्ज मंजुर केले होते. वादीने प्रतिवादींना दिनांक ०६.०५.२०२४ रोजी वकीलांमार्फत कायदेशीर नोटीस पाठविली. त्यानंतर प्रतिवादींना नोटीस मिळूनही रक्कम परतफेड केली नाही. सबब प्रतिवादी कडे एकुण रक्कम रुपये १,३५,४९८/- देय असल्याचे कथन करुन दावा मंजुर करण्याची विनंती केली.

**<u>वादप्रश्न क्रं. १ करिता-</u>**

१२) रक्कम वसुलीच्या दाव्यामध्ये प्रथमतः वादीने त्याच्यामध्ये व प्रतिवादीमध्ये झालेला व्यवहार सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच सदर व्यवहारावर किती टक्क्यांनी व्याज ठरले आहे हे सिध्द करणे आवश्यक असते. तसेच, व्यवहारापोटी काही रक्कम परत मिळाली असल्यास, किती रक्कम मिळाली अगर कसे व येणे बाकी रक्कम असलेबाबत सुस्पष्ट पुरावा अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सदरचा पुरावा सर्व शक्यतांमधील प्रभावी शक्यतेच्या तत्वानुसार वादी संबंधीत तथ्य सिध्द करतो अगर नाही हे पडताळणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे वादीचे संबंधीत कागदोपत्री पुरावा याचे परीक्षण करणे क्रमप्राप्त ठरते.

१३) या अनुषंगाने वादीने निशाणी क्र. ०७ वरील त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये दाव्यातील कथनांचाच पुनराच्चार केलेला आहे. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दिनांक ०९.०७.२०२१ रोजी रक्कम रूपये १,००,०००/- चे गवत, मका इ. पिके घेण्यासाठी आणि दुग्ध व्यवसाय चालवण्यासाठी कर्ज दरमहा दरशेकडा १२ टक्के व्याजाने वादी कडून घेतलेले आहे. तसेच प्रतिवादीने मान्य केले आहे की, मासिक हप्ते थकित झाल्यास अधिकचे दंड व्याज प्रतिवादीने देण्याचे आहे. या कथनांच्या पुष्ठर्थ वादीने निशाणी क्र.०४ वर प्रतिवादींचे कर्ज प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती एकत्रात दाखल केल्या आहेत. वादीने दाखल केलेल्या वरील सर्व कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने बँकर्स बुकस पुरावा नोंद कायदा, १८९१ च्या कलम ४ चा उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते.

**कलम ४: बँकर्सच्या पुस्तकातील नोंदींचा पुरावा देण्याचा प्रकार**

*"या कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून, बँकर्सच्या पुस्तकातील कोणत्याही नोंदीची प्रमाणित प्रत सर्व कायदेशीर कार्यवाहीमध्ये अशा नोंदीच्या अस्तित्वाचा प्रथमदर्शनी पुरावा (prima facie evidence) मानली जाईल. आणि ज्या प्रत्येक प्रकरणात, मूळ नोंद कायद्यानुसार पुरावा म्हणून स्वीकारार्ह आहे, त्याच मर्यादेपर्यंत आणि त्याच प्रकारे, प्रमाणित प्रत त्यामध्ये नोंदवलेल्या बाबी, व्यवहार आणि खात्यांचा पुरावा म्हणून स्वीकारली जाईल."*

१४) अशा परिस्थितीमध्ये वरील कायदयाचे तत्व विचारात घेतले असता, वादीने प्रतिवादीचे कर्जप्रकरण सिध्दीसाठी दाखल केलेली कागदपत्रे पुराव्यात स्वीकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे एकंदरीतच सामंजस्य करार (नि.क्र. ०८) चे अवलोकन केले असता प्रतिवादीने रक्कम रूपये १,००,०००/- कर्ज त्यावर १२ टक्के व्याजाने घेतले असल्याचे दिसून येत आहे. तसेच नि.क्र.०९ वरील गहाणखताचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, प्रतिवादी यांनी त्यांचे दुग्ध व्यवसायातील गुरे, ऊस, मका इ. यांचे गहाणखत वादीच्या हक्कात नोंदवून दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर कागदपत्रांची पडताळणी केली असता, असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी वादीकडून गवत, मका इ. पिके घेण्यासाठी आणि दुग्ध व्यवसाय चालवण्यासाठी कर्ज

एकूण रक्कम रूपये १,००,०००/– कर्जाऊ घेतली होती. त्यावर दरमहा दरशेकडा १२ टक्के व्याज आकारणी ठरली होती. हे कर्ज प्रकरण कर्ज ज्ञापनानुसार ता. ०९.०७.२०२१ रोजी वादी व प्रतिवादी दरम्यान ठरले. त्यापैकी दिनांक २८.०९.२०२२ पर्यंत कर्जाची रक्कम रूपये ९८,८५१/– इतकी थकबाकी आहे. तसेच दिनांक २९.०९.२०२२ पासून दावा दाखल तारखेपर्यंत रूपये २९,४५०/– इतकी व्याजाची रक्कम असून, थकबाकी रकमेवर विलंब झाल्यामुळे जमा झालेले दंड व्याज ४,१९७/–, नोटीस फी १,५००/– व इतर खर्च रूपये १,५००/– असे एकूण १,३५,४९८/– इतकी रक्कम प्रतिवादी वादीस देणे लागतात. सदर वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ने सुध्दा वादपत्रातील कथनांना दुजोरा देण्यासारखी व समर्पक कथने केली आहेत व सदर व्यवहाराबाबतची संपूर्ण विश्वासार्ह कागदोपत्री अभिलेख निशाणी क्र. ०४ लगत सादर केले आहे. वादीच्या या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे प्रतिवादीने हजर होवून कैफियत देवून अगर उलटतपास घेवून खंडन केले नाही. त्यामुळे सबब, वादीची त्याने प्रतिवादी यास रक्कम रूपये १,००,०००/– कर्जप्रकरणा पोटी दिल्याची कथने नाकारण्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही त्यामुळे वादीची सदरची कथने विश्वासार्ह वाटतात. म्हणून सदर वाद प्रश्नाचे उत्तर मी **होकारार्थी** नोंदवत आहे.

**वादप्रश्न क्र. २ करिता–**

१५) सदर प्रश्न वादी एकूण रक्कम रूपये १,३५,४९८/– रूपये वसुल होवून मिळणेस पात्र आहे का याबाबतचा असल्याने अभिलेखावरील तशी तथ्ये तपासणे क्रमप्राप्त ठरते. त्या अन्वये वादीने त्याच्या शपथपत्रादरम्यान वादपत्रातील कथने पुनरावृत्त केली आहे. याउपर त्याने त्याच्या समर्थनार्थ निशाणी क्र.०४ वर कर्जप्रकरणातील सर्व कागदपत्रे हजर केली आहेत. निशाणी क्र. १२ वरील प्रतिवादींच्या कर्जखात्याचे अवलोकन केले असता दिनांक २८.०९.२०२२ पर्यंत कर्जाची रक्कम रूपये ९८,८५१/– इतकी थकबाकी आहे. तसेच दिनांक २९.०९.२०२२ पासून दावा दाखल तारखेपर्यंत रूपये २९,४५०/– इतकी व्याजाची रक्कम असून, थकबाकी रकमेवर विलंब झाल्यामुळे जमा झालेले दंड व्याज ४,१९७/–, नोटीस फी

१,५००/– व इतर खर्च रूपये १,५००/– असे एकूण १,३५,४९८/– रूपये येणे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरीतच सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी हे वादीस रक्कम रूपये १,३५,४९८/– वादीस देणे लागतो असे दिसून येत आहे. याउपर प्रतिवादी ने दाव्यामध्ये त्याच्या बचावार्थ कोणताही पुरावा अगर तथ्ये दाखल केली नाहीत. वरील सर्व तथ्ये प्रतिवादीने कैफियतीनुसार अगर उलटतपासाअन्वये कुठेही खंडन केले नाही. सबब, वादीच्या तोंडी व लेखी दस्तऐवजानुसार प्रतिवादी हे वादीला वरील कर्जप्रकरणापोटी एकूण रक्कम रूपये १,३५,४९८/– वादीस देणे लागतो हे तथ्य शाबीत होते.

१६) याउपर वादीने निशाणी क्र.४/१३ लगत जी नोटीस प्रतिवादीला कर्ज मागणीसाठी पाठवली, त्याची स्थळप्रत दाखल केली आहे. सदरची नोटीस निशाण क्र.१३ वर आहे. साक्षीदार क्र. १ ने सदर नोटीसीमधील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले व नोटीसीवरील वकीलांची सही बँकेचे अभिलेखावर असलेने बरोबर असलेचे कथन केले. त्याअन्वये वादीने कर्ज मागणीसाठी प्रतिवादीला नोटीस दिल्याचे तथ्य सिध्द होते. परंतु या नोटीसीस प्रतिवादींनी उत्तर दिले अगर कसे अगर त्या नोटीसीमधील कथन आजपर्यंत आव्हानित केली नाही. परंतु लिमिटेशन ॲक्ट १९६३ आर्टिकल २१ नुसार कर्ज रक्कम देय असलेपासून वादी प्रस्तुतचा रक्कम वसुलीचा दावा तीन वर्षाच्या आत दाखल करू शकतो. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा मुदतीत आहे. वरील सर्व चर्चेअंती वादीची कथने नाकारण्यासाठी प्रतिवादी ने कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर दिले नाही. म्हणजेच वादीने वरील तोंडी व लेखी दस्तऐवजावरून जी शक्यता मांडली आहे, तिच शक्यता प्रभावी असल्याचे दिसून येते. म्हणून वादी हा त्याच्या समर्पक पुराव्यातून प्रतिवादी कडून १,३५,४९८/– रक्कम वसूल होवून मिळणेस पात्र ठरतो. या कारणास्तव वादप्रश्न क्र. २ चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवत आहे.

**वादप्रश्न क्र. ३ करिता–**

१७) प्रश्न क्र. १ व २ वरून हे सुस्पष्ट होते की, प्रतिवादी हा वादीस रक्कम

रूपये १,३५,४९८/– देणे लागतो. परंतु वादीने वादपत्र विनंती कलम १२अ अन्वये सदरची रक्क्म प्रतिवादी कडून रक्कम वसुल होवून मिळेपर्यंत व्याज मिळावे अशी विनंती केली आहे. परंतु दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ३४ अन्वये सदरची मागणी ही कायदेशीर आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४ मधील तरतुद खालीलप्रमाणे–

> ***Interest*** *– (1) Where and in so far as a decree is for the payment of money, the court may, in the decree, order interest at such rate as the court deems reasonable to be paid on the principal sum adjudged, from the date of the suit to the date of the decree, in addition to any interest adjudged on such principal sum for any period prior to the institution of the suit, [with further interest at such rate not exceeding six per cent, per annum, as the court deems reasonable on such principal sum], from the date of the decree to the date of payment, or to such earlier date as the court thinks fit.*
>
> *Provided that where the liability in relation to the sum so adjudged had arisen out of a commercial transaction, the rate of such further interest may exceed six per cent, per annum, but shall not exceed the contractual rate of interest or where there is no contractual rate, the rate at which moneys are lent or advanced by nationalised banks in relation to commercial transactions.*
>
> *Explanation – I] In this sub-section, "nationalised bank" means a corresponding new bank as defined in the Banking Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act. 1970 (5 of 1970).*
>
> *Explanation – II] For the purposes of this section, a transaction is a commercial transaction, if it is connected with the industry, trade or business of the party incurring the liability.*
>
> *(2) Where such a decree silent with respect to the payment of further interest on such principle sum from the date of decree to the date of payment or other earlier date, the court shall deemed to have refused such interest and a separate suit therefore shall not lie.*

१८) आकारण्यात येणा–या व्याजाबद्दलची दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम

३४ अन्वये नमूद असलेले वरील तरतुद विचारात घेतली असता, वादी व प्रतिवादीमध्ये रक्कमेवरील व्याजाबाबत लेखी करार झाल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर निशाणी क्र. ०४ लगत निशाणी क्र.०८ वर दाखल केला आहे. त्याअन्वये प्रस्तुतची रक्कम प्रतिवादीला द.सा.द.शे. १२ टक्के व्याजदराने मुदतीने दिल्याचे तथ्य कागदोपत्री पुराव्याने सिध्द होते. या कागदोपत्री पुराव्यास प्रतिवादीने कुठेही आव्हानित केलेले नाही. प्रतिवादी हे वादीस ता. २८.०९.२०२२ रोजी रक्कम परतफेड करणेस असमर्थ ठरला, परंतु वादीने प्रस्तुतच्या दाव्यात ता. २९.०९.२०२२ पासुन व्याजआकारणीची मागणी केलेली नाही. त्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करावा लागलेने दावा दाखल तारखेपासून सदरच्या रक्कमेवर, रक्कम वसुल होईपर्यंत म्हणजेच दावा सुरू असतानाचे व भविष्यातील व्याज मिळण्यास पात्र आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये व्यावसायिक करार पाहता देय रक्कमेवरील व्याज हे द.सा.द.शे ६ टक्क्यांपेक्षा जास्त असू शकते. परंतु वादी व प्रतिवादी दरम्यान ठरलेल्या करारापेक्षा जास्त नसावी व तसा करार ठरला नसेल तर राष्ट्रीयकृत बँकांनी व्यवसायिक व्यवहारापोटी ठरविलेला दर लावणे बंधकारक आहे. परंतु प्रस्तुतच्या केसमध्ये वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान ठरले कर्ज व्यवहारादरम्यान मुद्दल रक्कमेवर द.सा.द.शे १२ टक्के व्याज ठरलेचे निशाणी क्र. ०८ वरील कर्ज करारानुसार स्पष्ट होते. त्यामुळे वादी दावा दाखल तारखेपासून प्रस्तुतची रक्कम वसुल होवून मिळेपर्यंत मुद्दल रक्कमेवर १२ द.सा.द.शे टक्के दराने व्याज मिळणेस पात्र आहे. या विचाराअंती मी वादप्रश्न क्र. ३ चे उत्तर त्याप्रमाणे नोंदवत आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ४ करिता–</u>**

१९) वादप्रश्न क्र. १ ते ३ याला उपलब्ध पुराव्यांचे आधारे नोंदवलेल्या निष्कर्षाची परिणीती म्हणून हे स्पष्ट होते की, वादीचा दावा अंशतः मंजुर होणेस पात्र आहे व वादीने वादपत्र विनंती कलम १२अ प्रमाणे अनुतोष मिळणेस पात्र आहे. परंतु वादीने वादपत्र विनंती कलम १२ब नुसार प्रतिवादी च्या मिळकतीवर बोजा ठेवणे पूर्ण वसुली होईपर्यंत हस्तातंरास मनाईचा हुकुम व्हावा अशी विनंती केली आहे. परंतु वादीला हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतेवेळी संबंधीत न्यायालयाकडे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नुसार सदरची विनंती करता येईल व त्या अन्वये त्याचेवेळी सदरची विनंती

ग्राहय धरता येईल. त्यामुळे वादीच्या कलम १२ब वरील केलेली विनंती नामंजुर करणेस पात्र ठरते. प्रतिवादीच्या असमर्थनामुळे वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करणेस भाग पडलेने या दाव्याचा खर्च प्रतिवादी कडुन वसुल करून घेणे उचित वाटते. म्हणून वरील चर्चेअंती प्रश्न क्र. १ ते ४ च्या निष्कर्षावरून प्रश्न क्र. ५ चे उत्तरादाखल खालील परिणामकारक आदेश पारित करीत आहे .

| अनु क्र. | आदेश |
|---|---|
| १. | वादीचा दावा खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो. |
| २. | प्रतिवादी याने वादीस दावा रक्कम रूपये १,३५,४९८/- (रक्कम एक लाख पस्तीस हजार चारशे अठ्ठयाण्णव रूपये फक्त ) हे आदेश पारित केलेपासून दोन महिन्याच्या आत द्यावेत. |
| ३. | प्रतिवादी ने वादीला रक्कम रूपये १,३५,४९८/- (रक्कम एक लाख पस्तीस हजार चारशे अठ्ठयाण्णव रूपये फक्त ) वर दावा दाखल तारखेपासून एकूण रक्कम रूपये १,३५,४९८/- (रक्कम एक लाख पस्तीस हजार चारशे अठ्ठयाण्णव रूपये फक्त ) पूर्णपणे वसुल होईपर्यंत द.सा.द.शे १२ टक्के व्याजदराने व्याज देखील द्यावे. |
| ४. | येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा. |

ANIL SAHEBRAO SONWALKAR

Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2026.04.22 18:08:28 +0530

ठिकाणः पंढरपूर (ए. एस. सोनवलकर),

दिनांकः २२/०४/२०२६. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt.S.A.Lagale |
| Court | - | 4th Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 22.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 22.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 22.04.2026 |